# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

http://www.dteau.org roaurangabad.dte@gmail.com

आयएसओ ९००१-२००८ मान्यता प्राप्त

फॅक्स व्दारे

क्रं विकाऔ/शिक्षण/2010/ ६७११

दिनांक :- 5 OCT 2010

प्रति,
प्राचार्य
विना-अनुदानित अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था (इंजिनियरींग)
औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था(बी फार्मसी)तसेच
एमबीए/एमसीए पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या संस्था

विषय :- शैक्षणिक वर्ष 2010-11 गुणवत्ता यादी पडताळणी/इबीसी सवलत योजना

उपरोक्त प्रकरणी शैक्षणिक वर्ष 2010-11 गुणवत्ता यादी तपासणी संदर्भात दिनांक 12/10/2010 रोजी अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था (इंजिनियरींग) प्राचार्य आणि प्रवेश समिती प्रमुखांची बैठक सकाळी 11-00 वाजता आणि औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था (बी फार्मसी) व एमबीए/एमसीए पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या संस्थातील प्राचार्य आणि प्रवेश समितीप्रमुखांची बैठक दिनांक 12/10/2010 रोजी दुपारी 3-00 वाजता शासकिय अभियांत्रिकी महाविदयालय औरंगाबाद येथील इलेक्ट्रानिक्स विभागाच्या सेमिनार हॉलमध्ये आयोजित करण्यात येत आहे.

सदर बैठकीमध्ये 2010-11 शैक्षणिक वर्षातील विदयार्थ्यांच्या गुणवत्ता यादी तपासणी कार्यपध्दती बददल मार्गदर्शन करण्यात येईल.याच बैठकीमध्ये 2010-11 वर्षात इबीसी सवलत मंजुरी बाबतची अल्पसंख्याक शिष्यवृत्ती कार्यपध्दती बाबतही चर्चा होईल.

उपरोक्त बैठकीसाठी प्राचार्य आणि गुणवत्ता यादी/इबीसी/अल्पसंख्याक शिष्यवृत्ती संबंधित अधिकारी/कर्मचारी वर्गांनी उपस्थित रहावे. या बैठकीत गुणवत्ता यादी तपासणी आणि इबीसी सवलती मंजुरीची कार्यपध्दती शीघ्र गतीने होण्याच्या दृष्टीने संस्थास्तरावरुन आणि या कार्यालयास तपासणीच्या वेळी येणा-या अडचणीची यावर चर्चा होईल. तसेच या बैठकीमध्ये विदयार्थ्याना जिल्हा समाजकल्याण विभागामार्फत मिळणारी शिष्यवृत्ती,अल्पसंख्याक शिष्यवृत्ती इ.प्रकरणी देण्यात येणा-या सवलतीवरही मार्गदर्शन होईल.

प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद.

प्रत : या कार्यालयाच्या प्रोगॅमर यांना माहितीस्तव व कळविण्यात येते की सदर पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर बैठक गुणवत्ता यादी तपासणी -इंजिनियरींग दिनांक 12/10/10 सकाळी 11-00 वाजता व औषधनिर्माण पदवी /एमबीए/एमसीए दिनांक 12/10/10 दुपारी 3-00 वाजता या शिर्षाखाली प्रसिध्दिस दयावे.